महाराष्ट्र शासन

क्रमांक : आंजिब-४९१७/प्र.क्र.७९/आस्था-१४,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, तळमजला,
२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०५ ऑगष्ट २०१७.

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सर्व.

२) शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय :- जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत
संदर्भ :- शासनाचे समक्रमांकाचे दि. ७.७.२०१७ व दि. ३१/७/२०१७ चे पत्र.

महोदय,

यापूर्वी संदर्भाधीन पत्रान्वये आंतरजिल्हा बदलीने रुजु झालेल्या शिक्षकांना पदस्थापना देताना कोणती पदे प्राधान्याने भरण्यात यावीत, याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

आंतरजिल्हा बदलीने हजर झालेल्या शिक्षकामध्ये जर गरोदर महिला,स्तनदा माता असतील तर अशा महिला शिक्षकांना सर्वप्रथम प्राधान्याने समायोजनाने पदस्थापना देण्यात यावी. अशी पदस्थापना देताना पुर्ण जिल्हात ज्या ठिकाणी बदलीने नियुक्ती देण्यास रिक्त जागा असतील (Clear Vacancy) त्या रिक्त जागेवर त्यांच्या सोईनूसार पदस्थापना देण्यात यावी.म्हणजेच या महिला शिक्षकांना पदस्थापना देताना दि.७/७/२०१७ रोजीच्या पत्रामध्ये पदस्थापना देण्याबाबत दिलेल्या सूचना या दोन संवर्गातील महिला शिक्षकांना लागू राहणार नाहीत. सदर पत्र प्राप्त होण्यापूर्वीच शिक्षकांना पदस्थापना देण्यात आलेली असेल, तर या शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे सोईनुसार पदस्थापना बदलून द्यावी.

आंतरजिल्हा बदलीने हजर झाल्यानंतर संबधित जिल्हा परिषदेने पदस्थापना देऊनही अद्याप काही शिक्षक आपल्या शाळेवर हजर झाले नाहीत असे निर्दशनास आले आहे. शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे ही बाब प्रशासकीय दृष्ट्या योग्य नाही. सबब, ज्या शिक्षकांना आंतरजिल्हा बदली झाल्यानंतर संबधितशाळांचे नियुक्ती आदेश देऊनही त्या शाळेवर सोमवार दि. ७/८/२०१७ रोजी हजर झाले नाहीत तर संबधित शिक्षकांना तात्काळ निलंबित करण्यात यावे व त्याची यादी शासनास सादर करावी, जेणेकरून आंतरजिल्हा बदली यादीतील अन्य शिक्षकांना त्या जिल्हामध्ये पाठविण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करता येईल.

कृपया ही बाब तातडीची समजण्यात यावी.

(प्रि.श. कांबळे)
अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग

www.pradipkumbhar.blogspot.in Scanned by CamScanner